●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ११३ ●बुधवार, दि. २३ जुलै २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये
● Beed (Maharashtra) ● Year 5 ●Issue 113 ● Wednesday, 23 July 2025 ● RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ● Page 1 ● Pages 4 ●Price 3 Rs.




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# वाल्मीक कराडचा दोषमुक्तीचा अर्ज फेटाळला



## आता जामीनासाठी धडपड !

**बीड । प्रतिनिधी**

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून हत्या प्रकरणात मुख्य आरोपी असलेल्या वाल्मीक कराड याचा दोषमुक्तीचा अर्ज बीडच्या विशेष न्यायालयाने फेटाळला. दोषमुक्तीचा अर्ज फेटाळल्यानंतर आता वाल्मीक कराड याने जामीनासाठी धडपड सुरू केली आहे. तर विष्णू चाटे व इतर आरोपींनीही खटल्यातून वगळावे, दोषमुक्त करावे म्हणून अर्ज दाखल केला.

सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील मुख्य आरोपींपैकी वाल्मीक कराड याच्या दोषमुक्तीच्या अर्जावर आज बीडच्या विशेष न्यायालयात सुनावणी झाली. न्यायालयाने त्याचा अर्ज फेटाळला. या दणक्यानंतर आता कराड याच्या वकीलांनी जामीनासाठी अर्ज दाखल केला आहे. या प्रकरणाची पुढील सुनावणी ४ ऑगस्ट रोजी होणार आहे. गेल्या सुनावणी दरम्यान वाल्मिक कराडच्या दोषमुक्ती अर्ज व संपत्ती जप्त करण्याबाबत युक्तिवाद झाला होता.

विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी त्याला विरोध करत युक्तीवाद केला होता. वाल्मीक कराड हाच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील पडद्यामागचा सूत्रधार होता, तोच मास्टर माईंड होता हे निकम यांनी न्यायालयात सांगितले होते. दोन्ही बाजूच्या युक्तिवादानंतर न्यायालयाने निर्णय राखून ठेवला होता. आज यावर सुनावणी झाली. यावेळी वाल्मिक कराडने केलेल्या दोषमुक्तीचा अर्ज न्यायालयाने फेटाळला. तर वाल्मिक कराडच्या संपत्ती अर्जावरील निर्णय राखून ठेवला.

विशेष म्हणजे वाल्मीक कराड याचा अर्ज फेटाळल्यानंतर या प्रकरणातील दुसरा आरोपी विष्णू चाटे व इतर सर्व आरोपींनी आम्हाला या खटल्यातून वगळावे, दोषमुक्त करावे अशा प्रकारचा अर्ज केला. तर दोषमुक्तीचा अर्ज फेटाळल्यानंतर वाल्मिक कराडने ▶▶ उर्वरित पान २ वर

# नगरपालिकेच्या किरण देशमुख याच्या पापाचा घडा भरला !

## कारवाई करण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेना १५ ऑगस्ट ला आंदोलन करणार

● किरण देशमुख याच्या भ्रष्टाचाराची पोलखोल दैनिक मराठवाडा पत्राने यापूर्वीच केली आहे.

● किरण देशमुख याचा आका आता याला वाचवणार का ?

**●मराठवाडा पत्र दैनिकाने बातमी लावून धरली**

**बीड नगर परिषद बांधकाम विभागा अंतर्गत सन २०२३ ते २०२५ या कालावधीत न.प. फंडातून १० लाखाच्या आतील अंदाजपत्रकाद्वारे झालेल्या सिमेंट रस्ते व सिमेंट नाल्यांचे काम न करता कोट्यावधी रुपयांचे बोगस बिले काढून भ्रष्टाचार केला असल्याच्या बातम्या यापूर्वी मराठवाडा पत्र दैनिकाने लावून धरली होती. आता या भ्रष्टाचारी किरण देशमुख याच्या विरोधात संघटना व पक्षाचे पदाधिकारी रस्त्यावर उतरले आहेत. कोणालाही न जुमानता भ्रष्टाचाराच्या डोहात बुडालेल्या या किरण देशमुख याला आता जनताच धडा शिकवणार आहे.**



**बीड । प्रतिनिधी**

बीड नगर पालिकेच्या बांधकाम विभागा अंतर्गत सन २०२३ ते २०२४ व सन २०२४ ते २०२५ या आर्थिक वर्षामध्ये १० लाखापर्यंतची मर्यादा असलेले शेकडो बोगस अंदाजपत्रके तयार केली गेली. यामध्ये सिमेंट रस्ता व सिमेंट नालीचे काम केल्याचे दाखवून कामे न करता सर्रासपणे बोगस बिले रेकॉर्ड करुन ती काढली गेली. या कामासाठी न.प. फंडातील पैसा वापरला गेला. याम ध्ये काही ठरावीक मजूर संस्था/ सोसायटी तसेच काही माजी ▶▶ उर्वरित पान २ वर

# धारूर घाटात पुन्हा अपघात... तात्काळ रुंदीकरण होणे गरजेचे

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर घाटात अपघातांची मालिका सुरूच असून, अरुंद रस्ते, संरक्षण भिंतींचा अभाव व जम्पिंग रस्त्यामुळे वाहनचालक व प्रवाशांना दररोज जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहे.

सोमवार २१ जुलै रोजी सायंकाळी ५ वाजता धारूर शहरात तेलगावकडे जात असलेल्या एम एच ४४ यू ५४४५ क्रमांकाच्या सिमेंट कॉंक्रीट मालवाहतूक वाहनाचा अपघात घाटात झाला. अरुंद व उंचसखल रस्त्यामुळे नियंत्रण सुटून ही गाडी पलटी झाली. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी वाहनाचे मोठे नुकसान




झाले आहे. दररोज होणाऱ्या अपघातांमुळे वाहनचालक व प्रवाशांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. घाटातून प्रवास करणे टाळावे का, असा प्रश्न अनेकांच्या मनात निर्माण झाला आहे. यापूर्वीही घाटात अशाच प्रकारचे अपघात घडले असून, अनेकांनी आपले प्राण, मानसिक संतुलन व आर्थिक स्थैर्य गमावले आहे. मात्र प्रशासन व लोकप्रतिनिधी याकडे सातत्याने दुर्लक्ष करत असल्याचा आरोप होत आहे. वाहनचालक व प्रवाशांनी प्रशासन व लोकप्रतिनिधींना आवाहन केले आहे की, धारूर घाटातील रस्ता अति महत्त्वाचा मानून त्वरित दुरुस्ती, रुंदीकरण व सुरक्षिततेसाठी आवश्यक उपाययोजना कराव्यात, जेणेकरून भविष्यात जीवित हानी टाळता येईल.

# कॉंग्रेस पक्षाच्या वतीने दिल्लीमध्ये ओबीसीच्या न्याय हक्कासाठी महासंमेलन : वसंत मुंडे

**नवी दिल्ली । प्रतिनिधी**

ओबीसीच्या विविध न्याय हक्काच्या मागण्यासाठी अखिल भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे अध्यक्ष खा. श्री मल्लिकार्जुन खरगे, विरोधी पक्ष नेते राहुल गांधी, अखिल भारतीय ओबीसी कॉंग्रेसचे अध्यक्ष डॉ.अनिल जयहिंद, महाराष्ट्र ओबीसी कॉंग्रेसचे अध्यक्ष भानुदास माळी यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २५ जुलै २०२५ रोजी तल कटोरा स्टेडियम, दिल्ली येथे कॉंग्रेस पक्षाच्या ओबीसी विभागाच्या वतीने देशपातळीवर महासंमेलन आयोजित केल्याची माहिती



महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेस कमिटी ओबीसी विभागाचे प्रदेश उपाध्यक्ष वसंत मुंडे यांनी दिली.

मनमोहन सिंग सरकारच्या काळात २०१४ मध्ये जातीनिहाय जनगणना - आर्थिक स्थिती, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, स्त्री पुरुष मुले वारस कुटुंबाची रोजगार, स्वतःचे घर किंवा किरायाचे घर, नोंदी, वाहने, उत्पन्नाचे माध्यम, कुटुंबाची मालमत्ता इत्यादी प्रक्रिया राबवून - जनगणना केली. पण आरएसएस च्या विचारांच्या भाजप सरकारने त्रुटी काढून २३ सप्टेंबर २०२१ रोजी सर्वोच्च न्यायालयात प्रतिज्ञापत्र दिले. त्यामध्ये मोदी सरकारने जातीय जनगणना करणार नाही, अशी शपथपत्राद्वारे माहिती सर्वोच्च न्यायालयाला दिल्यामुळे आजतागायत जातिनिहाय ▶▶ उर्वरित पान २ वर

# आष्टी-पाटोदा-शिरूर (का.)विधानसभा मतदारसंघात आ.सुरेश धस यांच्यावतीने मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस यांना 'हरित शुभेच्छा'

**आष्टी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा.देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त पांढरी शिवारातील आंधळेवाडी रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपणाचा भव्य उपक्रम राबवण्यात आला. हा उपक्रम आष्टी-पाटोदा-शिरूर कासार विधानसभा मतदारसंघाचे कार्यसम्राट आमदार सुरेश धस यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला.

पांढरी ते आंधळेवाडी आणि आष्टी शहरातील बाजार समि



तीच्या परिसरात आणि शेकापूर रोड परिसरात रस्त्याच्या दोन्ही बाजूंना लावण्यात आलेली ही झाडं भविष्यात गावात हरित पट्टा निर्माण करून सौंदर्यात भर घालणार असून पर्यावरणाच्या दृष्टीनेही अत्यंत उपयुक्त ठरणार आहेत. सामाजिक भान ठेवत पर्यावरण संवर्धनाचा सकारात्मक संदेश देणारा हा उपक्रम परिसरात कौतुकास पात्र ठरला आहे.

यावेळी आष्टी येथे माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे गटनेते किशोर झरेकर,सभापती सुरेश वारंगुळे, सभापती शरीफ शेख,नगरसेवक बाळासाहेब घोडके, दीपक निकाळजे,समीर बेग,सादिक कुरेशी, भाऊसाहेब निंबाळकर, बबलू शेख, शहादेव नरोडे, ▶▶ उर्वरित पान २ वर

# मुंगी ते कुंडी फाटा रस्त्याचा प्रश्न मार्गी लावा

## आ. प्रकाशदादांना परिसरातील सरपंचांचे साकडे



**दिंद्रुड । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील मुंगी ते कुंडी फाटा या रस्त्याची प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या माध्यमातून सिमेंट कॉंक्रिटीकरण मंजूर करत दळणवळणासाठी या मार्गाचा प्रश्न मार्गी लावण्याचे माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश दादांना परिसरातील जैतापूरचे सरपंच भागवत दराडे, मुंगीचे सरपंच सचिन सोळंके व कुंडीचे सरपंच उमेश कांदे यांनी साकडे घातले आहे. आमदार दादांना दिलेल्या निवेदनात, मुंगी ते कुंडी हा आठ ते दहा किलोमीटर अंतराचा रस्ता निकृष्ट व अरुंद असल्याने मुंगी देवठाणा कान्नापूर अमला जैतापूर ▶▶ उर्वरित पान २ वर

# अर्धमसला ग्रामपंचायतीत 28 लाखांचा अपहार प्रकरणी ; जिल्हा परिषदेच्या चौकशी आदेशानंतरही कारवाई नाही

## ग्रामस्थ यांनी सुरु केले आमरण उपोषण


**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील अर्धमसला ग्रामपंचायतीत पंधराव्या वित्त आयोग आणि रोजगार हमी योजनेतून सुमारे २८ लाख रुपयांच्या बनावट कामांचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला



आहे. सरपंच, ग्रामसेवक आणि उपअभियंत्यांनी संगनमताने बनावट कामांची यादी तयार करून निधी उचलल्याचा ठपका आहे. पाचेगांव रस्ता ते राजेंद्र गिरी शेत (१,४२,२६३ रु.), रामनी थोपटे व सचिन मैंद शेत (६८,५०५ रु.), चबन मिसाळ घर ते अंबादास वस्ती (४,३३,३४५ रु.), अर्धमसला ते कल्याण धोपटे शेत (१,१०,४८४ रु.), राम मैंद घर ते जिल्हा परिषद शाळा खडीकरण रस्ता (७५,१४८ रु.), गावातील दगडी फरशा (६४,१५२ रु.), दलित वस्ती रस्ता (७,००,००० रु.), पथदिवे (१०,००,००० रु.) आणि ▶▶ उर्वरित पान २ वर






# राजीनामा की राजकीय ब्लास्ट? उपराष्ट्रपती धनखड यांची अचानक एक्झिट आणि सत्ताधाऱ्यांचा संशयास्पद यू-टर्न!

उपराष्ट्रपती पदाचा जगदीप धनखड यांनी दिलेला तडकाफडकी राजीनामा गूढ विषय बनला आहे. त्यांच्या कृतीमागे आरोग्याला प्राधान्य देण्यापलिकडे बरेच काही आहे का, असा अंदाज वर्तवणाऱ्या चर्चांच वादळ उठले आहे.

विशेष म्हणजे, धनखड यांच्याविषयीच्या सत्ताधारी आणि विरोधकांच्या भूमिकांमध्ये पूर्ण बदल झाल्याचे दिसून येत आहे. याआधी सातत्याने धनखड यांची होणारी प्रशंसा सत्ताधाऱ्यांच्या गोटातून गायब झाली आहे. तर, धनखड यांच्या कार्यपद्धतीवर वारंवार आक्षेप घेणारे विरोधक त्यांच्याविषयी चांगले शब्द वापरू लागले आहेत. सत्ताधारी आणि विरोधकांनी धनखड यांच्याविषयी घेतलेला यू-टर्न त्यांच्या राजीनाम्याबाबतचा सस्पेन्स वाढवणारा ठरला आहे.

संसदेचे पावसाळी अधिवेशन सोमवारपासून सुरू झाले. अधिवेशन शुरू झाल्याच्या दिवशीच धनखड यांची राजीनामा दिला. ती घडामोड रात्री घडली. वैद्यकीय कारणास्तव पदावरून



पायउतार होत असल्याचे त्यांनी म्हटले. वैद्यकीय सल्लयानुसार आरोग्याला प्राधान्य देण्यासाठी संबंधित निर्णय घेतल्याचे त्यांनी नमूद केले. मात्र, धनखड यांच्या राजीनाम्यामागे जे दिसतेय; त्यापलिकडेही खूप काहीतरी असावे, असा सूर विरोधकांच्या गोटातून आळवला जात आहे. त्याउलट, सत्ताधाऱ्यांच्या गोटातून धनखड यांच्या राजीनाम्याविषयी मोन बाळगले जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे धनखड यांनी पायउतार व्हावे अशी सत्ताधाऱ्यांची इच्छा असावी, असा तर्कही राजकीय वर्तुळातून पुढे आला आहे. धनखड यांनी रात्री राजीनामा देण्याआधी दिवसभर राज्यसभेत काही चकित करणाऱ्या घटना घडल्या. विशेषतः सरकारच्या दृष्टीने तो घटनाक्रम अनपेक्षित ठरला. उपराष्ट्रपती या नात्याने राज्यसभा अध्यक्ष पदाची धुरा सांभाळत असणारे धनखाड त्या घटनांच्या केंद्रस्थानी होते. रोकड प्रकरणावरून वादग्रस्त ठरलेल्या न्यायाधीश यशवंत वर्मा यांना हटवण्यासाठी संसदेत महाभियोग ठराव आणण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

तसा ठराव आणण्याच्या नोटिसा सोमवारी तोकसभा आणि राज्यसभा या संसदेच्या दोन्ही सभागृहांत सादर करण्यात आल्या. सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना साधीला घेत लोकसभेत नोटीस सादर केली. तशा प्रकारची नोटीस राज्यसभेत सादर करण्याची सरकारची योजना नव्हती. मात्र, राज्यसभेत केवळ विरोधी पक्षांच्या ६३ खासदारांच्या स्वाक्षाया असणारी नोटीस सादर झाली. ती बाब सरकारच्या दृष्टीने अकल्पनीय स्वरूपाची ठरली. विशेष म्हणजे, विरोधकांनी सादर केलेल्या नोटिसीची दखल धनखड यांनी घेतली. नोटीस मिळाल्याची माहिती त्यांनी स्वतः सभागृहाला दिली.

सरकारसाठी अनपेक्षित ठरलेल्या राज्यसभेतील घडामोडीनंतर काही वरिष्ठ केंद्रीय मंत्री ॲक्शन मोडमध्ये आले. त्यांनी राज्यसभेतील सत्ताधारी गोटातील काही खासदारांच्या स्वाक्षया घेतल्या. राज्यसभेतील नोटिसीमागे केवळ विरोधक नसल्याचे चित्र पुढे करण्यासाठी सत्ताधारी गोटात त्या हालचाली झाल्याचे मानले जाते.

सत्ताधारी आणि धनखड एकमेकांवर नाराज झाले असावेत, असे विश्लेषणही काही जाणकारांकडून केले जात आहे. धनखड मूळचे वकिली पेशातील आहेत. त्यामुळे वर्मा यांना हटवण्यासाठीचा ठराव केवळ लोकसभेत मांडला जाणार असल्याची माहिती मिळाल्यानंतर त्यांची बाजूला ठेवण्यात आल्याची भावना बनती असावी. धनखड यांनी राज्यसभेच्या कामकाज सल्लागार समितीची बैठक बोलावली होती. मात्र, त्या बेठकीत सभागृह नेते जे. पी. नड्डा आणि संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजीजू सहभागी झाले नाहीत. ती बाब सरकारची धनखड यांच्याविषयीची नाराजी सूचित करत असल्याचे त्या जाणकारांना वाटते.

◆ पान ४ वरून पुढे...

## विद्यार्थ्यांनी अविनाश...

विविध वैयक्तिक खेळात यशस्वी झालेल्या खेळाडूंना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरित करण्यात आले. वेगवेगळ्या वयोगटातील स्पर्धा असल्याने स्पर्धक मोठ्या संख्येने होते त्यामुळे बक्षीस वितरण कार्यक्रम दोन ते अडीच तास सुरू होता. पुढे बोलताना माजी आ. भीमराव धोंडे यांनी सांगितले की, अविनाश साबळे यांचे आई वडील वीट भट्टी वर काम करीत होते. अशा बिकट परिस्थितीतून शिक्षण घेऊन तो आज जागतिक पातळीवरील धावपटू बनला आहे. तसेच पैलवान राहुल आवारे, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस यांनी आपल्या भागाचे नावलौकिक केले आहे.

◆ पान ४ वरून पुढे...

विद्यार्थ्यांनो तुम्ही देखील काटक, कष्टाळू व जिद्दी आहात तुमच्या मधून अविनाश साबळे, राहुल आवारे निश्चित निर्माण होतील असे मला वाटते. चांगला पौष्टिक आहार घ्या. अभ्यासाबरोबर खेळाकडे ही जाणीव पूर्वक लक्ष द्यावे. कोणताही खेळ खेळताना नियमित सराव करा. खेळामुळे जीवनात काहीतरी निश्चित करता येते. राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर खेळात यशस्वी झाल्यास नोकरीच्या भरपूर संधी मिळतात. कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना प्राचार्य डॉ. हरिदास विधाते यांनी सांगितले की, आपल्या परिसरातील आतापर्यंतचा हा सर्वात मोठा क्रीडा महोत्सव आहे. संस्थेने हा महोत्सव पुढील वर्षीही कडा येथेच घ्यावा. कार्यक्रमास संस्थेतील मुख्याध्यापक, शिक्षक व खेळाडू विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

सुत्रसंचलन उपप्राचार्य बापु खैरे, उपप्राचार्य संभू वाघुले, प्रा. कुचेकर, प्रा. खेमगर यांनी केले.

## लम्पी मुळे...

चालू होती त्यापैकी एका वासराचा गायीला पिता आले नाही म्हणून शुक्रवार दि.१८ जुलै २०२५ रोजी लम्पी आजारामुळे तडपून तडपून मृत्यू झाला. दुपत्या गायीच्या वासराचा मृत्यू झाल्यामुळे माझे प्रचंड मोठे आर्थिक नुकसान झाले आहे लम्पी आजारामुळे मृत्यू झाल्याची नोंद डॉ.फुंदे यांनी घेऊन शासनाकडून अनुदान प्राप्त करून द्यायला हवे कारण आपल्या जिल्ह्याच्या पंकजाताई मुंडे पशुसंवर्धन मंत्री असल्यामुळे त्याचा फायदा

◆ पान ४ वरून पुढे...

आम्हाला होऊ शकतो अस मत पशुपालक शेतकरी बाळकृष्ण अंडील यांनी व्यक्त केले.पहाडी पारगावचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.फुंदे यांनी गावाला वारंवार भेट देऊन पशूंची तपासणी करून लम्पी आजार आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न करावा अशी मागणी पशुपालक शेतकरी करत आहेत.

## श्री ष.ब्र.१०८..

सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे. दैनंदिन कार्यक्रम- पहाटे ५ ते ७ शिवपाठ, ९ ते १२ सार्वजनिक ईस्टलिंग पूजा रुद्र पूजा १२ ते १ प्रवचन व दर्शन सोहळा. व महाप्रसाद, सायं.६ ते ७ भजन, ७ ते ८ गुरुवार्यांचे अमृत उपदेश व महाप्रसाद.

◆ पान ९ वरून पुढे...

## वाल्मीक कराडचा...

जामिनावर मुक्तता करावी, असा अर्ज केला. त्यावर विशेष सरकारी वकील ॲड. उज्वल निकम यांनी म्हणणे मांडत विरोध केला. आज न्यायालयात ड्राफ्ट चार्ज करून वाल्मिक कराड आणि त्याचे साथीदार यांच्या विरोधात विविध कलमाखाली १२ ते १३ आरोप निश्चित केले जावे, असा विनंती अर्ज दाखल करण्यात आला. देशमुख हत्या प्रकरणातील आरोपींनी जे दोष मुक्तीचे अर्ज केले आहेत ते उशिरा दाखल केले आहे. आरोप पत्र दाखल केल्यानंतर दोन महिन्यात अर्ज करणे अपेक्षित होते. मात्र त्यांनी तो अर्ज केला नव्हता. त्यामुळे न्यायालयाने अर्ज फेटाळावे, अशी मागणी उज्वल निकम यांनी केली आहे. आता ४ ऑगस्ट रोजी यावर सुनावणी होणार आहे.

## नगरपालिकेच्या किरण...

नगरसेवक यांनी देखील आपापल्या भागात कामे केल्याचे दाखवून सदर कामे न करताच ही बिले उचलली गेली आहेत. या संदर्भात बीड शहरातील अनेक दैनिकामध्ये एक वर्षापासून सातत्याने बातम्या प्रकाशीत होत आहेत. तसेच काही सामाजिक कार्यकर्ते, राजकीय कार्यकर्ते, संघटना यांनी वेळोवेळी मा. जिल्हाधिकारी महोदय, नगर पालिका प्रशासक यांच्याकडे प्रत्यक्ष लेखी तक्रारी केल्या आहेत. परंतु यावर कसलीही कार्यवाही होत नाही. एखाद्या संघटनेने अथवा व्यक्तीने या बाबत बातमी दिल्यास नगर पालिकेतील या भ्रष्टाचाराला जबाबदार असलेल्या लोकांकडून तक्रारकर्त्याला मॅनेज करण्याचा प्रघात पडला आहे. त्यामुळे मा. जिल्हाधिकारी महोदय यांना नम्रपणे विनंती आहे की, तक्रारीत नमुद केलेल्या खालील मुद्यांची त्वरीत दखल घेवून यावर कठोर कार्यवाही होणे गरजे आहे. बीड नगर पालिका बांधकाम विभागा अंतर्गत सन २०२३ ते २०२४ आणि सन २०२४ ते २०२५ या आर्थिक वर्षात १० लाखाच्या आतमधील न.प. फंडातून झालेल्या सिमेंट रस्ते व नाल्याचे काम न करता कोट्यावधीचे बिले काढून भ्रष्टाचार झाला असल्याने या संदर्भात वरीष्ठ अधिकाऱ्यांची चौकशी समिती निर्माण करुन संबंधितावर तात्काळ कार्यवाही करण्यात यावी.

बीड नगर पालिका बांधकाम विभागा अंतर्गत सन २०२३ ते २०२४

◆ पान ९ वरून पुढे...

आणि सन २०२४ ते २०२५ या आर्थिक वर्षात १० लाखाच्या आतमधील न.प. फंडातून झालेल्या सिमेंट रस्ते व नाल्याचे काम न करता कोट्यावधीचे बिले काढून भ्रष्टाचार झाला असल्याने या कामांचे स्पेशल ऑडीट करण्यात यावे. बीड नगर परिषद हद्दीतील सन २०२३ ते २०२४ आणि सन २०२४ ते २०२५ या आर्थिक वर्षात बीड नगर पालिका हद्दीतील आरक्षित जागांची बेकायदेशीररित्या गुंठेवारी केली गेलेली आहे. ही आरक्षित जागांची गुंठेवारी करण्यामध्ये पालिकेतील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा हात आहे. त्याम ुळे आरक्षित व इतर जागांची झालेली गुंठेवारीची चौकशी करण्यासाठी समिती गठीत करुन संबंधितावर तात्काळ कार्यवाही करावी. बीड नगर पालिका बांधकाम विभागात सोमनाथ सदगर हे उप अभियंता होते, परंतु बोगस अंदाजपत्रकावर सह्या करण्यास अथवा बोगस अंदाज पत्रकांची बीले रेकॉर्ड करण्यास त्यांनी असमर्थता दर्शवल्याने किंवा या सर्व भ्रष्टाचाराच्या प्रकरणात सामील होण्यास नकार दिल्याने मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी कनिष्ठ अभियंता असणाऱ्या किरण देशमुख यांना अधिकार नसतांना देखील सिमेंट रस्त्याची व नाल्यांची अंदाजपत्रके तयार करण्याचे, त्यावर सह्या करण्याचे व त्या खोट्या अंदाजपत्रकांचे बीले काढण्याचे काम देशमुख यांच्याकडून करून घेतलेले आहे. त्यानंतर सदगर यांचा उप अभियंता पदाचा कार्यभार काढून तो कार्यभार एक ते दीड महिन्यापूर्वी किरण देशम ुख यांच्याकडे देण्यात आलेला आहे. त्यामुळे अधिकार नसतांना तयार केली गेलेली बोगस अंदाजपत्रके ही मुख्याधिकारी नीता अंधारे व किरण देशमुख यांनी केवळ न.प. फंडातील पैशाचा भ्रष्टाचार करण्या करीता तयार केली व त्यातून कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केला. त्यामुळे हा सर्व पैसा किरण देशमुख व नीता अंधारे यांच्याकडून वसुल करण्यात यावा. किरण देशमुख (सद्य स्थितीतील बांधकाम उप अभियंता) हे बीड नगर पालिका कार्यालयात सतत गैरहजर असतात. त्यांच्या वैयक्तिक फोनचे इनकमींग कॉल कायमस्वरुपी बंद असतात. केवळ व्हॉटस्ॲप कॉलवर ते ठराविक लोकांशीच बोलतात. त्यामुळे नगर पालिका कार्यालयामधील सहा महिन्यापर्यंतचे सीसीटीव्हीचे फुटेज तपासून किरण देशमुख यांच्यावर तात्काळ निलंबनाची कार्यवाही करण्यात यावी.

निर्माण करुन बीड नगर पालिकेतील किरण देशमुख (उपअभियंता) व इतर सर्व जबाबदार कर्मचाऱ्यांवर तात्काळ कार्यवाही करावी नसता येत्या १५ ऑगस्ट २०२५ रोजी मा. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लोकशाही

◆ पान ९ वरून पुढे...

मार्गाने या भ्रष्टाचाराच्या विरोधात तीव्र असे अंदोलन उभारण्यात येईल. विभागीय आयुक्त साहेब, विभागीय आयुक्त कार्यालय छत्रपती संभाजीनगर उप विभागीय अधिकारी, बीड तथा मुख्य प्रशासक बीड नगर पालिका उप आयुक्त नगर परिषद प्रशासन बीड, मुख्याधिकारी, नगर परिषद बीड यांच्याकडे अशोक तावरे राज्य उपाध्यक्ष, सदाशिव बिडवे जिल्हा उपाध्यक्ष, वैभव काकडे मा. जिल्हाध्यक्ष ,रामेश्वर साळुंके शेतकरी सेना जिल्हाध्यक्ष,आदर्श तरकसे उप शहराध्यक्ष आदिने लेखी स्वरूपात तक्रार केली आहे

## काँग्रेस पक्षाच्या वतीने...

जनगणना होऊ शकलेली नाही. दलित, वंचित, आदिवासी, ओबीसीवर खूप मोठ्या प्रमाणावर अन्याय झालेला आहे. काँग्रेस पक्षाच्या वतीने अनेक वेळा सरकारला तेलंगणा राज्याचे ७४ निकषांचे जातनिहाय जनगणनेसाठी मॉडेल वापरण्याची विनंती केली. परंतु अहंकारी सरकारला देशातील सर्वच आरक्षण संपवायचे आहे. त्यामुळे तेलंगाना पॅटर्न अहंकारी केंद्र सरकारने राबवण्यास नकार दिला. विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनी जातिनिहाय जनगणना झालीच पाहिजे व शेतकऱ्यांच्या तरुण युवक युवती च्या रोजगारासाठी सामान्य जनतेच्या महागाईच्या संदर्भात यासाठी देशभर पदयात्रा काढून जनजागरण करून दबाव तंत्राचा वापर केल्यामुळे सरकारला काँग्रेस पक्षाच्या नेत्यांमुळे झुकावे लागले. म्हणून मल्लिकार्जुन खरगे, राहुल गांधी, के. राजू, डॉ. अनिल जयहिंद, भानुदास माळी यांच्या नेतृत्वाखाली दिल्ली येथे काँग्रेसच्या वतीने ओबीसी विभागाचे ऐतिहासिक महासंमेलन आयोजित केल्याची माहिती ओबीसी काँग्रेसचे नेते वसंत मुंडे यांनी दिली.

## आष्टी-पाटोदा-शिरुर...

आत्माराम फुंदे, सुरज रोकडे, बंटी धोंडे, पत्रकार शरद रेडेकर, सलीम कुरेशी,पांढरी येथे सरपंच सुधीर पठाडे माजी सरपंच प्रकाश वांढरे, जालिंदर वांढरे,बंडू देशमुख, गणेश शेळके उपसरपंच गोवर्धन शेंबडे, अंबादास भोगाडे,वाल्मीक वांढरे,दादा वांढरे,धोंडीबा बापू वांढरे,प्रकाश हंबर्डे,अमृत वांढरे,रमेश वांढरे,दादा शेळके,अंगद पेचे,नामदेव वांढरे,राम वांढरे तसेच या उपक्रमात आष्टी आणि पांढरी गावातील नागरिकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग नोंदवला.

◆ पान ९ वरून पुढे...

## मुंगी ते कुंडी...

सुकळी कुंडी या गावच्या रहिवाशांना दळणवळणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. याची दखल घेत जैतापूरचे सरपंच भागवत दराडे, सरपंच सचिन सोळंके व सरपंच उमेश कांदे यांनी आमदार प्रकाश दादा सोळंके यांची सोमवारी भेट घेत मुंगी ते कुंडी फाटा हा बीड परळी महामार्गाला जोडणाऱ्या रस्त्याचा प्रश्न मार्गी लावण्याचे आवाहन केले आहे. या भागातील शेतकरी व्यापारी दळणवळण करणाऱ्या नागरिकांना अत्यावश्यक असलेला रस्ता लवकरात लवकर प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत मार्गी लावावा असे साकडे याप्रसंगी आमदार सोळंके यांना घालण्यात आले. माजलगाव मतदार संघाचे विकासाभिमुख नेतृत्व आमदार प्रकाश दादा सोळंके व ग्रामीण भागातील जनतेसाठी सदैव तत्पर असलेले जयसिंह सोळंके हे या रस्त्याचा प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावतील असा विश्वास असल्याचे सरपंच भागवत दराडे यांनी याप्रसंगी माध्यमांना सांगितले.

## अर्धमसला ग्रामपंचायतीत...

घनकचरा व्यवस्थापन (५,००,००० रु.) अशा कामांद्वारे २७,९३,८९७ रुपयांचा अपहार झाल्याचे तक्रारीत नमूद आहे. जिल्हा परिषदेने ४ फेब्रुवारी २०२५ रोजी गटविकास अधिकाऱ्यांना चौकशीचे आदेश दिले, परंतु पाच महिन्यांहून अधिक काळ लोटला तरी कारवाई झालेली नाही. यामुळे संतप्त ग्रामस्थांनी २१ जुलै २०२५ पासून ग्राम पंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले. लोकनेते बाळराजे पवार यांनी उपोषणाला भेट देत पाठिंबा दिला, तरी प्रशासनाने दखल घेतलेली नाही. शिवाजी राऊत, अशोक नांद्रे आणि कैलास गिरी यांच्या नेतृत्वाखालील उपोषणात ग्रामस्थांनी मागणी केली की, २०२२ ते १५ जुलै २०२५ पर्यंतच्या बनावट कामांची चौकशी करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत आणि निधी वसूल करावा. तसेच, रोजगार हमी योजनेचा निधी चौकशी होईपर्यंत स्थगित करून ग्रामपंचायतीचे खाते बंद करावे. प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे गावाचा विकास रखडला आहे, असे राऊत म्हणाले. ग्रामस्थांनी सरपंचाला महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमानुसार अपात्र ठरविण्याची मागणी केली आहे. जोपर्यंत न्याय मिळत नाही, तोपर्यंत उपोषण सुरू ठेवण्याचा त्यांचा निर्धार आहे.


## जाहीर प्रगटन

सर्व जनतेस व खासकरुन बीड जिल्ह्यातील जनतेस या जाहीर प्रगटनाव्दारे सुचीत करण्यात येते की, आमचे पक्षकार नामे **१) राणी दत्तात्रय थापडे २) दत्तात्रय शेषेराव थापडे रा. उमरद खालसा ता.जि.बीड** यांनी दिलेल्या माहिती, अधिकार व दाखवलेल्या कागदपत्रावरुन खालीलप्रमाणे जाहीर प्रगटन देतो की, श्री. गोविंद माधवराव तळेकर कुलमुखत्यारपत्र देणार बेबीनंदा गोविदराव तळेकर रा. रामकृष्ण नगर, वसमत रोड, परभणी यांचे मालकी व ताब्यातील र.डी.जि.प.बीड सब डि पं. स.व ता.बीड येथील नगर परिषद बीड यांचे कार्यकक्षतेतील शुक्रवार पेठ येथील नगर परिषद वार्ड क्र. ३ जुना घर मिळकत नं. ३/१५/२०८, नविन घर मिळकत नं. ३/१५/२१५ नगर परिषद पीटी. आर प्रमाणे क्षेत्र १०९.८८ चौ.मी. असून या जागेचा शहर भुमापन क्र. २९८९ असुन त्यानुसार मोकळया जागेचे क्षेत्र ११६.२ चौ.मी. या मिळकतीवर लोड बोरिंग मध्ये तळ मजला बांधकाम केलेले क्षेत्र ७८.२६ चौ. मी. बिल्टअप ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. पुर्वेस :- रस्ता पश्चिमेस श्री. सखाराम पाटील यांचे घर, दक्षिणेस रस्ता, उत्तरेस श्री जफर कादरी यांचे घर

वरील चतु:सिमेअंतर्गत येणारे मिळकत आमचे पक्षकार १) राणी दत्तात्रय थापडे २) दत्तात्रय शेषेराव थापडे हे सदर मिळकतीचे मालक श्री. गोविंद माधवराव तळेकर कुलम ुखत्यारपत्र देणार बेबीनंदा गोविदराव तळेकरे यांचे कडून खरेदी करुन घेणार आहेत. या जाहीर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, सदर मिळकतीच्या खरेदीखताबाबत कसल्याही प्रकारचा व्यवहार जसे की, ईसारपावती, खरेदीखत, गहाणखत, बक्षीसपत्र, आम मुखत्यारपत्र, दिवाणी व फौजदारी वाद, कर्ज बोजा, वाटणी, हिबानामा व इतर कोणत्याही स्वरुपाचे कोणतेही व्यवहार अथवा वाद असल्यास ०८ दिवसाचे आत कागदोपत्री पुराव्यासोबत खाली दिलेल्या पत्त्यावर संपर्क साधावा. ०८ दिवसात या संदर्भात कोणाचा काही आक्षेप नसल्यास आमचे पक्षकार या मिळकतीचे रितसर खरेदीखत करुन ती कायम स्वरुपी विकत घेतील. त्या नंतर कोणतीही तक्रार केली तरी ती मान्य होणार नाही. सबब हे जाहीर प्रगटन.

बीड, दिनांक : २२/०७/२०२५

**जाहीर प्रगटन देणार**
**१) राणी दत्तात्रय थापडे, २) दत्तात्रय शेषेराव थापडे, मो.नं. ९८८१३२२६७४**
**मार्फत : ॲड. योगेश एस. टेकाडे जिल्हा व सत्र न्यायालय बीड, मो.नं. ९४०४२२७२४०**

## जाहीर प्रगटन

**मा. विशाखा बी. पाटील ६ वे सह. दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ५४२/२०२५**
**सोपान किसन ओव्हाळ विरूध्द निरंक**

अर्जदार - १. सोपान पि. किसन ओव्हाळ, वय ७७ वर्षे धंदा शेती राहणार लोणीघाट तालुका जिल्हा बीड. २. प्रविण पी.सोपान ओव्हाळ वय ४९ वर्षे धंदा शेती. रा.लोणीघाट तालुका जिल्हा बीड.हा. मु. तेलुको रस्ता जवळ ३३४ जे नवीन मज्जित पुरवत सुपर मार्केट, पुणे शहर भोसरी ३. अरविंद पि.सोपान ओव्हाळ , वय ४४ वर्षे धंदा शेती राहणार लोणीघाट तालुका जिल्हा बीड. हल्ली मु. गणेश पान स्टोअर्स जवळ, पॉवर हाऊस जवळ, बालाजीनगरी भोसरी पुणे. ४. सांगिताबैन भ्र. वाल्मीकभाई आगे वय ४८ वर्षे धंदा,घरकाम , टी ३९७, प्रेमनगर भेदवाड , पांडेसरा सुरत, (गुजरात).

विरुध्द

गैरअर्जदार - निरंक, मागणी- वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत सबजान भ्र. सोपान ओव्हाळ यांचे वारस असल्या बाब बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे ज्या अर्थी सबजान भ्र. सोपान ओव्हाळ, मृत्यु दि.१०/०२/२०२५ रोजी मौजे लोणीघाट ता. जी. बीड. येथे मयत झालेले असून अर्जदार हा मताचा मुलगा आहे.

वरील अर्जदार यांना शासकीय व खाजगी कामासाठी वारस प्रमाणपत्र याची आवश्यकता आहे त्या अर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की सदर होऊन अर्जदार सदर हो मयताचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत त्यांनी या कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की जर सदर हो मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्यास सदरहू कोर्ट सदर होऊ यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाब्दिक दिसल्यास त्यांना सदरहू मयत सबजान भ्र. सोपान ओव्हाळ, मौजे लोणीघाट, ता. जी.बीड. यांचे वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. याची नोंद घ्यावी. आज दिनांक. २५/०३/२५ रोजी. माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्याने दिले आहे.

सदर प्रकरणाची **पुढील तारीख** दि. ०८/०९/२०२५ आहे.
**(मार्फत - ॲड. त्रिंबक जाधव)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **शिक्का** **(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक** **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. आर. ए. मिसाळ यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ६२३/२०२५**
**रंजना सतिष दळवी विरूध्द निरंक**

ज्याअर्थी मयत नामे सतीष छगनराव दळवी हे / हया दिनांक २१/४/२०२५
रोजी मोजे खळेगाव ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले / झाल्या आहेत. अर्जदार क.१. रंजना प्र सतिष दळवी, वय - ४२ वर्षे, धंदा - शेती, रा. खळेगांव ता. गेवराई, जि. बीड, २ . यश सतिष दळवी वय: १२वर्षे, अ.पा. क. आई अर्जदार क. १ . रंजना अ सतिष दळवी रा. सदर ३. रोशनी पि. सतीष दळवी, वयः १० वर्षे, अ.पा. क. आई अर्जदार क.१. रंजना अ सतिष दळवी रा. सदर ४. छगन पि. रामभाउ दळवी वयः ७१ वर्षे धंदा : शेती रा. खळेगांव ता. गेवराई, जि. बीड ५. लताबाई प्र. छगन दळवी वय: ६५ वर्षे धंदा: शेती रा. खळेगांव ता. गेवराई, जि. बीड यांनीशासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारसप्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे सतीष छगनराव दळवी यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक १९/०७/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख २८/०८/२०२५
**(मार्फत - ॲड बी. के. निकाळजे, गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **शिक्का** **(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक** **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर,गेवराई**

## वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

**गेवराई, जि. बीड येथील सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्रीमती एस एच पाटील यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक : ५१६ / २०२५**
**सीता संजीव मंचरे विरुद्ध निरंक**

ज्याअर्थी मयत नामे नंदाबाई अंकुश सातपुते हया दिनांक २४/०६/ २०२४ रोजी सिरसदेवी ता. गेवराई जि. बीड येथे मयत झाले आहेत.

अर्जदार- १. सीता संजीव मंचरे, वय २९ वर्षे धंदा - घरकाम, रा. सिरसदेवी, ता. गेवराई जि. बीड

२. मनिषा रावसाहेब बोंबले, वय ४४ वर्षे धंदा - घरकाम, रा. मादळमोही ता. गेवराई जि. बीड

शासकीय / निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे नंदाबाई अंकुश सातपुते रा. सिरसदेवी ता. गेवराई जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख : ०४.०८.२०२५**
**(मार्फत ॲड. आर यु पंडीत )**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **शिक्का** **(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक** **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, क.स्तर,गेवराई**


Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## महत्वाचे

### वांगीचे प्राथमिक आरोग्य केंद्र वाऱ्यावर कर्मचारी थांबत नसल्याने रुग्णांचे हाल

**बीड । प्रतिनिधी**

वांगी प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये कर्मचारी थांबत नसल्याने रुग्णांचे हाल होत आहेत. सदरील हे रुग्णालय बांधले कशासाठी? असा प्रश्न उपस्थित होत असून कर्मचाऱ्यांनी रुग्णालयात थांबावे, अशा सक्तीच्या सूचना वरिष्ठ अधिकाऱ्यांनी द्यावेत, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे. वांगी आरोग्य केंद्रामध्ये अनेक कर्मचाऱ्यांची नियुक्ती आहे, मात्र हे कर्मचारी रुग्णालयात रात्रीच्या दरम्यान थांबत नाहीत. रात्री एखादा रुग्ण आला तर त्यास थेट बीड येथे यावे लागते. शासनाने रुग्णांच्या सेवेसाठी आरोग्य केंद्र बांधले, मग कर्मचारी थांबत नसतील तर हे रुग्णालय काय कामाचे? असा प्रश्न उपस्थित करत रुग्णालयात कर्मचाऱ्यांनी थांबावे, तसे सक्तीचे निर्देश वरिष्ठांनी द्यावे, अशी मागणी हरिभाऊ शेळके यांनी केली आहे.

### के.एस.पी विद्यालय बीड येथील विद्यार्थी इयत्ता ५ वी व ८ वी शिष्यवृत्ती करिता धारक



**बीड । प्रतिनिधी**

दि.२१/०७/२०२५ रोजी के.एस.पी. विद्यालय येथील सन २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या शिष्यवृत्ती परिक्षा मध्ये यश संपादीत करणाऱ्या मुलांचा सत्कार करण्यात आले. इयत्ता ५ वी मधील विद्यार्थी चि.सानप राजवीर अशोक शिष्यवृत्ती परीक्षेतधारक झाला असुन, कु. स्वराली अजित जगताप, कु. शर्वरी शरद भोसले, चि. धांडे श्रेयश भाऊसाहेब, चि. कुंभारकर श्रीकर मधुकर, कु. नागरगोजे अस्मीता अशोक. हे विद्यार्थी शिष्यवृत्ती करिता पात्र झाले आहेत. तसेच शिष्यवृत्ती परिक्षामध्ये इयत्ता ८ वी मधील शाळेतील चि. नागरगोजे ओम नारायण, चि. ज्ञानेश्वर मोहळकर सर्जेराव , चि. सोहम सतिश कळसुळे, चि.उबाळे गौरव गणेश, कु.देविका प्रकाश मोरे, चि. अमर गिताराम सानप, चि. उबाळे गौरव गणेश, चि. प्रशांत विष्णु डंगळे, चि. ओम नारायण नागरगोजे, चि. सुयश हनुमंत भोंडवे हे देखिल विद्यार्थी पात्र झाले आहेत. या सर्व मुलांना शाळेतील शिक्षक श्री. गणेश शिंदे, श्री. गणेश बारगजे, श्रीमती जोगदंड मॅडम, श्री. जगदीश शिंदे, श्री. श्रीकांत अनपट, श्री. रणजीत कवचट, श्री. अमोल गाडेकर, श्री करण झिरपे, श्री. चक्रधर दाबेकर या शिक्षकांनी मुलांना शिष्यवृत्ती परिक्षेमध्ये यश मिळवण्या करिता परिश्रम घेतले. या सत्कार समारंभास सौ.अंजलीताई शेळके , प्रमुख उपस्थिती श्री. ऋषिकेशजी शेळके साहेब जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तथा समग्र शिक्षा विभाग प्रमुख तसेच शाळेतील प्र.मुख्याध्यापक, विशाल सुपेकर व शाळेतील शिक्षक शिक्षिकेत्तर कर्मचारी व पालक उपस्थितीत होते. सर्व मुलांचे कौतुक करुन सत्कार करण्यात आला व कार्यक्रम संपन्न झाला.

### साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये वकृत्व स्पर्धा

**बीड । प्रतिनिधी**

येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित, डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालय शाहूनगर बीड या विद्यालयाच्या वतीने साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त आंतरशालेय वक्तृत्व स्पर्धा ३१ जुलै २०२५ रोजी संपन्न होणार आहेत आणि या वकृत्व स्पर्धेचे बक्षीस वितरण साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंतीदिनी शुक्रवार दि.१ ऑगस्ट २०२५ रोजी होणार आहे. या सदरील वकृत्व स्पर्धा प्राथमिक गट इयत्ता ५ वी ते ७ वी वर्ग आणि माध्यमिक गट ८ वी ते १० वी या दोन गटांमध्ये राहील. स्पर्धेचे विषय प्राथमिक गट 'साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे क्रांतिकारी साहित्य' आणि माध्यमिक गट 'जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव' हे राहतील प्रत्येक गटासाठी एक स्पर्धक विद्यार्थ्यांना सहभागी होता येईल. विद्यार्थी स्पर्धकांनी आपल्या प्रवेशिका मंगळवार दि.२९ जुलै २०२५ पर्यंत सकाळी १० ते दुपारी ४ पर्यंत नोंदवावीत. सदरील स्पर्धा डॉ.बाबासाहेब आंबेडकर विद्यालय शाहूनगर बीड येथे गुरुवार दि. ३१ जुलै २०२५ रोज सकाळी १० वाजता संपन्न होतील. या स्पर्धे साठी प्राथमिक गट व माध्यमिक गट यासाठी प्रथम बक्षीस ५०१ रुपये, द्वितीय बक्षीस ३०१ रुपये, तृतीय २०१ रुपये व प्रमाणपत्र असे राहील. या वकृत्व स्पर्धेत स्पर्धकांनी सहभाग घ्यावा असे आवाहन संयोजकांतर्फे करण्यात येत आहे.

### धुतेकर संगीत विद्यालयाचा गुरुवंदना कार्यक्रम उत्साहात संपन्न – गुरुंप्रती कृतज्ञतेचा अनोखा अनुभव!



**बीड । प्रतिनिधी**

धुतेकर संगीत विद्यालयाच्या वतीने आयोजित गुरुपौर्णिमेनिमित्त गुरुवंदना कार्यक्रम अत्यंत उत्साही आणि भावपूर्ण वातावरणात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे वाय. जनार्दन राव, अमरजी डागा, सुदर्शन धुतेकर आणि सौ. अंजली धुतेकर यांच्या हस्ते सरस्वती पूजन व कै. विष्णुपंत धुतेकर यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून झाली. त्यानंतर विद्यालयाचे संचालक श्री सुदर्शन धुतेकर आणि त्यांच्या सुविद्य पत्नी सौ. अंजली धुतेकर यांचे विद्यालयातील शिष्यांच्या वतीने सन्मानपूर्वक गुरुपूजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सुमधुर अशी बहारदार गीते सादर केली, तसेच वैयक्तिक गायन सादर करत रसिकांची मने जिंकली. स्थानिक कलावंतांनी देखील या कार्यक्रमात सहभागी होऊन आपल्या गायनातून कार्यक्रमाची शोभा वाढवली. संपूर्ण कार्यक्रमात गुरूभक्तीचा आणि संगीतसाधनेचा समरस भाव अनुभवायला मिळाला. कार्यक्रमाला भारत अण्णा लोळगे, श्रीकांत कुलकर्णी, महेश वाघमारे, मान्यवरांची उपस्थिती लाभली.

# संतापजनक, लाथ मारली, केस ओढले;

## मुजोर परप्रांतीय तरुणाची मराठी तरुणीला बेदम मारहाण

**मुंबई । प्रतिनिधी**

कल्याण येथील नांदिवली परिसरात एका खाजगी रुग्णालयात एका मराठी तरुणीला बेदम मारहाण झाल्याची गंभीर घटना घडली आहे. रुग्णालयातील रिसेप्शनिस्ट म्हणून काम करणाऱ्या या तरुणीला, डॉक्टरांची मिटींग सुरू असल्याने थोडा वेळ थांबायला सांगितल्याच्या रागातून एका तरुणाने लाथांनी मारहाण केली. हा संपूर्ण प्रकार रुग्णालयाच्या सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला असून, या घटनेने एकच खळबळ उडाली आहे. मानपाडा पोलिस ठाण्यात याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, ही धक्कादायक घटना २१ जुलैच्या सायंकाळी 'श्री बाल चिकित्सालय' या खाजगी क्लिनिकमध्ये घडली. संबंधित रिसेप्शनिस्ट तरुणीने एका तरुणाला डॉक्टरांकडे सध्या एम आर (मेडिकल रिप्रेझेंटेटिव्ह) बसले असून, त्यांना नंतर भेटता येईल असे सांगितले. यावर तो तरुण संतप्त झाला. त्याचे नाव गौरव झा असून, त्याने रागाच्या भरात तरुणीला थेट लाथेने मारले आणि तिला ढकलून दिले.

सीसीटीव्ही फुटेजमध्ये हे दृश्य स्पष्टपणे दिसत आहे. असेही म्हटले जात आहे की, मारहाण करणारा तरुण नशेत धुंद होता. डॉक्टरांच्या स्पष्ट आदेशानुसार, तरुणीने त्याला केबिनमध्ये प्रवेश नाकारला होता. नियमांचे पालन करत असताना, त्याने जबरदस्तीने आत घुसण्याचा प्रयत्न केला. त्याला अडवण्याचा प्रयत्न करताच, त्याने मागे पळत येऊन तिच्या तोंडावर लाथ मारली, ज्यामुळे ती खाली कोसळली. तरीही त्याने तिच्यावर लाथाबुक्क्यांचा भयंकर मारा केला, असे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

कल्याणमधील या प्रकारामुळे डॉक्टरेतर कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेचा मुद्दा पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. फक्त डॉक्टरांची मिटींग चालू आहे, एवढे सांगितल्याने तरुणाने इतकी टोकाची प्रतिक्रिया का दिली, यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ही घटना घडण्यापूर्वी त्यांच्यात काही शाब्दिक वाद झाला होता का, याचा तपासही पोलीस करत आहेत. मात्र, कोणताही वाद असला तरी, एका महिलेवर अशा प्रकारे हल्ला करणे अत्यंत चुकीचे असून, या प्रकरणात कठोर कारवाई करण्याची मागणी जोर धरत आहे.

रुग्णालयात रुग्ण किंवा त्यांच्या नातेवाईकांकडून डॉक्टर आणि इतर वैद्यकीय कर्मचाऱ्यांना मारहाण केल्याच्या अनेक घटना अलीकडच्या काळात वाढल्या आहेत. यावर नियंत्रण आणण्यासाठी डॉक्टर आणि डॉक्टरेतर कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी विशेष कायदाही करण्यात आला आहे. असे असतानाही, वैद्यकीय कर्मचाऱ्यांवर होणारे हल्ले थांबलेले नाहीत. गौरव झा विरोधात मानपाडा पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पोलीसंनी मारहाण करणाऱ्या तरुणाला ताब्यात घेतले आहे.

# ११ एकरात भव्य फार्म आर्ट, माणिकराव कोकाटेंकडून अजित पवारांना अनोखे बर्थडे गिफ्ट

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा वाढदिवस. महाराष्ट्राच्या राजकारणातील दोन दिग्गज नेते म्हणून देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार यांच्याकडे पाहिले जाते. दोन्ही दिग्गज नेत्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. सध्या रमी गेममुळे वादात सापडलेले कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी अजित पवारांना वाढदिवसानिमित्त अनोखी भेट दिली आहे, ज्याची सर्वत्र चर्चा होत आहे. समोर आलेल्या माहितीनुसार, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना अनोख्या शुभेच्छा दिल्या आहेत. माणिकराव कोकाटे यांच्याकडून शिर्डी रोडवर चखऊ परिसरात तब्बल अकरा एकरात भव्य फार्म आर्ट साकारण्यात आले आहे. कोकाटे यांच्या सिन्नर मतदारसंघात शेतात तब्बल४,४२,९०० स्केअर फुटात तयार झालेलं हे देशातलं पहिलंच राजकीय फार्म आर्ट असल्याचं बोललं जातं आहे.



उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा भला मोठा फोटो या माध्यमातून दाखवण्यात आला आहे. 'अन्नदाता हाच देशाचा भाग्यविधाता' असा संदेश देत शेतकरी आणि ग्रामीण कलाकारांचा सन्मान करण्यासाठी हे खास फार्म आर्ट तयार करण्यात आले आहे. सुप्रसिद्ध कलाकार मंगेश निपाणीकर व क्षिप्रा मानकर यांच्या मार्गदर्शनाखाली ८ कलाकारांनी आणि २ ट्रॅक्टरच्या सहाय्याने केवळ सहा दिवसांत १० तास दररोज मेहनत घेऊन हे आर्ट उभं केले आहे. कोकाटेंनी दिलेल्या या अनोख्या गिफ्टची सध्या चांगलीच चर्चा होत आहे.

दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनीही अजित पवार यांना खास शब्दात शुभेच्छा दिल्या आहेत. महायुतीला भक्कमपणे साथसंगत करणाऱ्या उपमुख्यमंत्री ना. अजितदादा पवार यांना जन्म दिनाच्या अनेक शुभेच्छा! अर्थशास्त्रावर विलक्षण पकड असलेला उत्तम प्रशासक, डोळस विकासाचा निरंतर साथीदार, महाराष्ट्राच्या विकासाची आस असलेला संवेदनशील आणि वक्तशीर नेता म्हणजे आमचे अजितदादा. महाराष्ट्राच्या विकासापुढे काहीही नाही, याची ठाम खूणगाठ बांधून वाटचाल करणाऱ्या या आमच्या मित्रास दीर्घ आणि आरोग्यपूर्ण आयुष्य लाभो, हीच ईश्वर चरणी प्रार्थना, असं शिंदेंनी म्हटलं आहे.

# पोस्को,ॲट्रॉसिटी गुन्ह्यात प्रा.विजय पवारला जामीन मंजूर

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरातील नामांकित शिक्षण संकुल उमाकिरण लैंगिक अत्याचार प्रकरणातील आरोपी विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोघांना चार दिवसापूर्वी न्यायालयाने जामीन मंजूर केली होती.

बीड शहरातील उमाकिरण कोचिंग क्लास मधील एका १७ वर्षीय विद्यार्थिनीने दिलेल्या तक्रारीनुसार प्रा विजय पवार आणि प्रशांत खाटोकर या दोघांविरुद्ध पोस्को अंतर्गत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला होता. गुन्हा दाखल झाल्यावर विजय पवार व खाटोकर हे फरार झाले होते. पोलिसांनी मांजरसुंबा नजीक या दोघांना रात्री उशिरा अटक केल्यानंतर त्यांना न्यायालयासमोर हजर केले असता सुरुवातीला चौकशीसाठी पोलीस कोठडी व त्यानंतर न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती.



पवार आणि खाटोकर या दोघांविरोधात दोन वेगवेगळे गुन्हे दाखल झाले होते १७ जुलै रोजी पोस्को अंतर्गत दाखल झालेल्या गुन्ह्यात या दोघांना जामीन मिळाल्यानंतर विनयभंग प्रकरणात देखील न्यायालयाने मंगळवारी या दोघांना जामीन मंजूर केला आहे. या तक्रारीची दखल घेऊन राज्य महिला आयोगाच्या रूपालीताई चाकणकर यांनी या शिक्षण संस्थेतील इतर मुलीवरही असे काही प्रकार घडले असल्यास बीड पोलीस अधीक्षककाकडे तक्रार करण्यात यावी असे आवाहन केले होते, त्यावर बीड पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्याकडे श्री संत ज्ञानेश्वर इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या एका विद्यार्थिनीने आपल्या पालकास घडलेला प्रकार सांगून,प्रा.विजय पवार यांनी जातीय वाचक बोलण्याचे पालिकाने बीड पोलीस अधीक्षकाची भेट घेऊन घडलेला प्रकार सांगितला.त्यावर विनयभंग व ट्रॉसिटी चा गुन्हा दाखल केला होता.त्यावर आज सुनावणी होऊन प्रा.विजय पवारला ट्रॉसिटी मध्ये जामीन मंजूर करण्यात आला. आरोपीच्या वतीने वतीने ज्येष्ठ विधीज्ञ बाळासाहेब कोल्हे यांनी काम पाहिले.

### शुक्रवारी सासर आणि माहेरच्या नागरिकांचे रास्ता रोको आंदोलन

**परळी वै. । प्रतिनिधी**

परळी वैजनाथ येथील व्यापारी महादेव मुंडे यांचा निर्घृण पद्धतीने खून करण्यात आल्याच्या घटनेला तब्बल १९ महिने उलटले असताना आरोपींना अद्यापही अटक झाली नाही. याकरिता संबंधित प्रकरणात डखढ स्थापन करण्यात यावी तसेच आरोपींना तत्काळ अटक करण्यात यावी. कन्हेरवाडी हे महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांचे माहेर असून, भोपला हे त्यांचे सासर आहे. वरील दोन महत्त्वपूर्ण मागण्यांसाठी सासर आणि माहेरच्या सर्व ग्रामस्थांच्या वतीने शुक्रवार, दि.२५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता परळी – अंबाजोगाई मार्गावर कन्हेरवाडी येथे लोकशाही मार्गाने रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती राजेभाऊ श्रीराम फड यांनी कळविली आहे. परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांचा निर्घृणपणे खून झाल्याच्या घटनेला तब्बल २० महिने उलटले आहेत. या घटनेतील आरोपींना अद्यापही अटक करण्यात आलेली नाही. अतिशय संथगतीने घटनेचा तपास सुरू आहे. या प्रकरणी तत्काळ एसआयटी स्थापन करण्यात यावी व सर्व आरोपींना तत्काळ अटक करावी ही मागणी जोर धरत आहे. कन्हेरवाडी हे महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांचे माहेर असून, भोपला हे त्यांचे सासर आहे. दोन्हीही गावातील नागरिक लेकीला न्याय मिळवून देण्यासाठी सरसावले असून, यासंदर्भात शुक्रवार, २५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता परळी – अंबाजोगाई मार्गावरील कन्हेरवाडी येथे रस्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मंत्रालयात रक्तदान शिबिर

**मुंबई । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वाढदिवसानिमित्त मंत्रालयातील त्रिमूर्ती प्रांगणात आयोजित रक्तदान शिबिरात ८० रक्तदात्यांनी सहभाग घेऊन रक्तदान केले. महाराष्ट्र राज्य रक्त संक्रमण परिषद, सर जे. जे. महानगर रक्त केंद्र व हरिवंश राय बच्चन प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने या शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात राज्य माजी आमदार समन्वय समितीचे अध्यक्ष तथा माजी आमदार रामभाऊ गुंडीले, फिरोज मासुकदार, राज्य रक्त संक्रमण परिषदेचे सहाय्यक संचालक डॉ.



पुरुषोत्तम पुरी, तसेच प्रतिष्ठानचे संस्थापक निवृत्ती यादव यांची प्रमुख उपस्थिती होती. रक्तदान शिबिराच्या आयोजनासाठी सर जे. जे. महानगर रक्त केंद्राच्या वैद्यकीय अधिकारी डॉ. चित्रा आचार्य, सर जे जे रुग्णालय व महाविद्यालयाच्या वैद्यकीय सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती नीता डांगे, तसेच प्रतिष्ठानचे हरीश रावल आदींनी सहभाग घेतला. सकाळी ९ वाजता सुरू झालेल्या या रक्तदान शिबिरास सायंकाळी ५ वाजेपर्यंत लोकप्रतिनिधी, शासकीय व पोलीस अधिकारी, कर्मचारी, व नागरिकांनी भेट दिली. यावेळी रक्तदानाबाबत विविध माध्यमातून जनजागृती करण्यात आली.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. एल. एस. चव्हाण, न्यायाधीश, कौटुंबीक न्यायालय बीड, जि.बीड यांचे न्यायालयात**

**पीटीशन ए. क्रमांक १०५/२०२४.**

**योगेश वि. शितल**

अर्जदार :- योगेश पि. बापुराव रोमन, वय ३० वर्षे, धंदा मजुरी, सध्या निरंक रा. भागयनगर, तुळजाई चौक ता. जि. बीड मो. नं ८६६८५६७३२०

विरूध्द

गैरअर्जदार क्र २ :- कोंडीराम पि. हनुमान गायकवाड, वय : ३५ वर्षे, धंदा व्यापार वहान चालक, रा. जेजुरी राडे बेकराईनगर व्ही.टी.सी. ट्रान्सपोर्ट हडपसर पुणे. मो नं ८७६६९०२१९८

मागणी :- कलम १३ (i-a) हिंदु विवाह कायदा, १९५५ प्रमाणे अर्जदार व गैरअर्जदार क्र. १ यांचेतील विवाह विच्छेदनाचा हुकूमनामा होणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार **योगेश पि. बापुराव रोमन, वय: ३० वर्षे, धंदा : मजुरी, सध्या निरंक रा. भागयनगर, तुळजाई चौक ता. जि. बीड मो. नं ८६६८५६७३२०** यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदार यांचा अर्ज मंजुर करून दिनांक १२.०५.२०१८ रोजी झालेला विवाह विच्छेदित करून हुकूमनामा करण्यात यावा अशी मागणी केलेली आहे.

ज्याअर्थी यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून ३० तीस दिवसांच्या आत या न्यायालयासमोर स्वतः किंवा वकीलामार्फत हजर रहावे. अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनाक २१/०७/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख १९/०८/२०२५**

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)** **क.लिपीक** | **शिक्का** | **(स्वाक्षरीत)** **प्रबंधक (दि.वि. शेंडगे)** **कौटुंबिक न्यायालय बीड**

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
• छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे


# श्रीपत अंतर्वाला येथील जि. प.शाळेतील ज्ञानमंदिरातच मुख्याध्यापक दारु पिताना ग्रामस्थांनी पकडले

**तलवाडा । प्रतिनिधी**

शाळेला आपण ज्ञान मंदिराचा दर्जा दिलेला आहे आणि तेथील शिक्षक हे आपले गुरु असतात परंतु जर शाळेतील शिक्षक मुख्याध्यापक ज्ञान मंदिराला मद्यमंदिर बनवत असतील तर अशा शिक्षकांना शिक्षा झालीच पाहिजे, एक वर्षापूर्वी याच मुख्याध्यापकाची वरिष्ठाकडे तक्रार करून देखील कारवाई झाली नाही म्हणून आज चक्क गावकऱ्यांनी त्याला रंगीहात पकडून थेट पोलीस ठाण्यात नेल्याची घटना तलवाडा येथून जवळच असलेल्या श्रीपत अंतरवली जिल्हा परिषदेच्या शाळेत घडली.

श्रीपत अंतरवली तालुका गेवराई येथील जिल्हा परिषदेच्या शाळेच्या मुख्याध्यापकाच्या वर्तणुकीबद्दल आणि ज्ञानार्जन करत असताना दारूच्या नशेत असल्याबाबतच दारूच्या नशेत असतात त्यांची तक्रार शिक्षण विभागाकडे करण्यात आली होती या प्रकरणात चौकशी होऊन दोन्ही शिक्षक दोषी आढळल्यानंतर या दोघाच शिक्षकावर निलंबनाची



## • अशा कर्मचाऱ्यावर कारवाई होईल शिक्षण अधिकारी

**जिल्हा परिषदेच्या शाळेवर एखादा शिक्षक किंवा कर्मचारी माध्यमातून आलेला असेल किंवा करत असेल ही बाब अत्यंत गंभीर असून पालकांना असे आढळून आल्यास त्यांनी तात्काळ त्याला पोलीस ठाण्यामध्ये घेऊन जावून गुन्हा दाखल करण्यात आला त्याची वैद्यकीय तपासणी झाली की कारवाई होते मात्र आता या प्रकरणात आपण स्वत: चौकशी लावून कारवाई करू असे शिक्षणाधिकारी भगवान फुलारी यांनी बोलताना सांगितले**

कारवाई करण्यात आली होती आता तलवाडा पासून जवळ असलेल्या श्रीपत अंतरवर्ली येथील या मुख्याध्यापकावर काय कारवाई केली जाते याकडे शिक्षण समिती आणि पालकांचे लक्ष लागून आहे.

# विद्यार्थ्यांनी अविनाश साबळे व पै. राहुल आवारे यांचा आदर्श घ्यावा

## पुढच्या वर्षी डे नाईट स्पर्धा : माजी आ. भीमराव धोंडे

**कडा । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्याचे भूषण व आंतरराष्ट्रीय धावपटू अविनाश साबळे आणि पैलवान राहुल आवारे यांचा आदर्श समोर ठेवून विद्यार्थ्यांनी खेळ खेळावेत आणि जीवनात यशस्वी होऊन आई-वडिलांबरोबर आपल्या गावाचे आणि शाळेचे नावलौकिक करावे. आपली संस्था मोठी असून हजारो विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामुळे या क्रीडा महोत्सवांमध्ये मोठ्या संख्येने संघ सहभागी झाले परंतु तीन दिवसात स्पर्धा संपत नसल्याने पुढील वर्षापासून डे नाईट स्पर्धा होतील असे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी कडा येथे सांगितले.



कडा येथील बाबाजी संकुलामध्ये माजी आ. भीमराव धोंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित तीन दिवसीय भव्य क्रीडा महोत्सवाच्या समारोप व बक्षीस वितरण प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थपदावरुन बोलत होते. यावेळी व्यासपीठावर युवा नेते अजय दादा धोंडे, अभयराजे धोंडे, चेअरमन राजेश धोंडे, किशोर खोले, गोकुळ सव्वाशे, बाबुलाल भंडारी, महाराष्ट्र केसरी सईद चाऊस, उपसभापती पांडुरंग नागरगोजे, रिपाइंचे अध्यक्ष अशोक साळवे, हरिभाऊ जंजिरे, पांडुरंग गावडे, नगरसेवक अस्लम बेग तसेच संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. डी. बी. राऊत, प्रा. शिवदास विधाते, माऊली बोडखे, सागर वाघुले, ननवरे, प्राचार्य डॉ. हरिदास विधाते, प्राचार्य डॉ. अशोक गदादे, प्राचार्य डॉ. भगवान वाघुले, प्राचार्य दादासाहेब काळे, प्राचार्य डॉ. संजय धोंडे, मुख्याध्यापक संजय कोथमिरे, प्राचार्य आडसुळ, प्राचार्य कोल्हे, प्राचार्य बोडखे व इतर मान्यवर उपस्थित होते. खो - खो, कबड्डी, हॉलीबॉल या सांघिक तसेच

▶▶ उर्वरित पान २ वर



# लम्पी मुळे पहाडी पारगांवात वासराचा मृत्यू

**वडवणी । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील पहाडी पारगांवात एका वासराचा लम्पी त्वचा रोगामुळे मृत्यू झाला आहे तर अनेक जनावरे बाधित झाले आहेत त्यामुळे पशुपालकांमध्ये चिंतामयभीतीच वातावरण निर्माण झाले आहे या गावाला असलेले पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.फुंदे यांचे मात्र दुर्लक्ष अद्यापही कायम आहे. पशुपालक शेतकरी बाळकृष्ण अंडील यांच्या कारवड,गाय व तिचे दोन महिन्याचे वासरू यांना लम्पी त्वचा रोगाची लागण काही दिवसांपूर्वी झाली होती तेव्हा पशुपालकांनी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.फुंदे यांना वारंवार कल्पना दिल्यानंतर त्यांनी पशूंची पाहणीकरून लसीकरण केले होते. अंबाजोगाई येथून पशुवैज्ञानिकांच तज्ञ पथक येऊन पशूंची तपासणी केली पण कारवड,गायीला व तिच्या वासराला आलेल्या गाठी,ताप,चारा नखाने,पाणी नपिणे,पायामध्ये सूज, गाठी फुटल्यामुळे जनावरे विद्रूप झाली होती त्यांची तडपड पाहवेनासी झाल्यामुळे पशुपालक शेतकऱ्यांनी डॉ.फुंदे यांना याची कल्पना दिलीतरी ते आले नाहीत म्हणून मागील दहा दिवसापासून खाजगी पशुवैद्यकीय डॉक्टर कडून पशूंची ट्रीटमेंट

▶▶ उर्वरित पान २ वर

# पालकमंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली, बाजीराव चव्हाण यांच्या पुढाकाराने नागरिकांना मोफत छत्रीचे वाटप

**बीड । प्रतिनिधी**

धाराशिव जिल्ह्यात 'हरित धाराशिव' अभियानाच्या अनुषंगाने आयोजित करण्यात आलेल्या 'संकल्प वृक्षारोपण' कार्यक्रमात, पंधरा लक्ष वृक्ष एकादिवसात लावण्याचा उपक्रम, आणि नागरिकांना मोफत छत्रीचे वाटप करण्याचा नावीन्य पूर्ण कार्यक्रम धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री मा. ना. श्री. प्रताप सरनाईक साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या पुढाकारातून संपन्न झाला.

या उपक्रमामुळे पावसाळ्यात वृक्षारोपणात सहभागी होणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. यावेळी कार्यक्रमाला विशेष



उपस्थिती अभिनेता स्वप्नील जोशी यांचीही प्रमुख उपस्थिती लाभली. यावेळी युवा सेनेचे पदाधिकारी मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष जिल्हाप्रमुख महादेव मातकर, युवा सेना माजी जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, अजय सुरवसे, सरपंच लिंबाजी जाधव, युवानेते सुरज चुंगडे यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व शिवसैनिक युवा सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मोफत छत्री वाटपामुळे सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, अशा सामाजिक उपक्रमांमुळे जनसामान्यांचे प्रश्न सोडवण्यास मदत होत असल्याचे बाजीराव चव्हाण यांनी यावेळी बोलताना सांगितले.

## श्री ष.ब्र.१०८ तपोरत्न सदगुरू शिवानंद शिवाचार्य महाराज तमलूरकर यांचे ४१ वे अनुष्ठान व ईष्टलिंग शिवपूजा प्रारंभश्रीक्षेत्र कपिलधार येथे...

### श्रावण मासानिमित्त अनुष्ठान शुक्रवारी प्रारंभ

**बीड । प्रतिनिधी**

सर्व भाविक भक्तांना व शिष्यगणाना कळविण्यात अतिआनंद होतो की दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी श्री शिवानंद शिवाचार्य मठ संस्थान तमलूर चे मठाधीश श्री ष.ब्र.१०८ तपोरत्न सदगुरू शिवानंद शिवाचार्य महास्वामिजी यांचे ४१ वे अनुष्ठान शुक्रवार दि. २५ जुलै २०२५ रोजी श्री मन्मथ मुक्तिधाम मठ श्री क्षेत्र कपिलधर येते प्रारंभ होत आहे. तसेच बुधवार दि.२० ऑगस्ट २०२५ रोजी सांगता होणार आहे.

या श्रावण महिन्याच्या पावन पर्व काळानिमित्त या अनुष्ठानामध्ये ईस्टलिंग शिवपूजा, संगीत रुद्रपूजा व दररोज शिवपाठ भजन व प्रवचन होणार आहे या बरोबरच विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन संपूर्ण महिनाभर आयोजित केलेले आहेत. तरी या पावन



पर्वकाळामध्ये सर्व भाविक भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आलेले आहे. महाराजांच्या अनुष्ठान कार्यक्रमासाठी आंध्रप्रदेश,कर्नाटक , तेलंगणा आदी विविध राज्यातून लाखो भाविक भक्त कपिलधार येथे उपस्थिती लावतात व या सर्व कार्यक्रमाचा आनंद घेतात शिवनामाच्या गजरामध्ये परिसर शिवमय होऊन संपूर्ण भक्तीमय परिसर झालेला असतो तरी या पावन पर्व काळामध्ये पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी

▶▶ उर्वरित पान २ वर




## महत्वाचे

### जय किसान गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी ज्योती जगताप तर सचिव पदी पृथ्वी तिबोले




**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

गणेशोत्सव जवळ येत असून यादृष्टीने गणेश मंडळांनी तयारी करण्यास सुरुवात केली आहे.धारूर येथील राज्यस्तरीय जय किसान गणेश मंडळाने नुकतीच २०२५ गणेशोत्सव सोहळ्यासाठी ची कार्यकारणी जाहीर केली असून 'सन्मान नारी शक्तीचा' म्हणत महिला कार्यकारिणीची निवड केली आहे. अध्यक्षपदी ज्योती जगताप,उपाध्यक्षपदी अंकिता खामकर,ज्योती तिबोले,ज्योती धनवडे तर सचिव पदी पृथ्वी तिबोले यांचे सर्वानुमते निवड करण्यात आले मंडळाच्या वतीने महिला कार्यकारणी निवडल्याने सर्व स्थरातून मंडळाचे अभिनंदन केले जात आहे. शहरात दरवर्षी मोठ्या उत्साहात गणेशोत्सव साजरा केला जातो.अगदी काही दिवसांवर गणेशोत्सव येऊन ठेपला असून या दृष्टीने शहरातील मंडळाने तयारी सुरू केली आहे.येथील नावाजलेले राज्यस्तरीय जय किसान गणेश मंडळाने तयारी सुरू करत कार्यकारणी जाहीर केली आहे.सन्मान नारी शक्तीचा या प्रमाणे जय किसान गणेश मंडळाच्या वतीने २०२५ गणेशोत्सव साजरा करण्यासाठी महिलांची कार्यकारणी जाहीर केली असून अध्यक्षपदी सौ. ज्योती जगताप,उपाध्यक्षपदी सौ.अंकिता खामकर,सौ.ज्योती तिबोले,सौ.ज्योती धनवडे,सचिव सौ.पृथ्वी तिबोले,सहसचिव सौ.प्रीती दरेकर,कोषाध्यक्ष उर्मिला जगताप,भाग्यश्री ढाणे,सहकोषाध्यक्ष सौ.अश्विनी गिरी,सौ रोहिणी पांचाळ,साक्षी शंकर पवार,विशाखा गायकवाड यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे.यावेळी जय किसान मंडळाचे सदस्य मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.जय किसान मंडळाच्या च्या इतिहासात पहिल्याच वेळेस महिला कार्यकारणी निवडल्याने सर्व स्थरातून मंडळाचे अभिनंदन केले जात आहे.

### महाबीज तर्फे मौजे बोरखेड येथे कांदा बिजोत्पादन कार्यशाळा संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

महाबीजच्या वतीने मौजे बोरखेड ता.जि.बीड येथे २२/०७/२०२५ रोजी कांदा पिकाच्या FDR , B-780 व फुले समर्थ या वाणाची शेतकरी कार्यशाळा घेण्यात आली यावेळी महाबीजचे जिल्हा व्यवस्थापक श्री.अजय ए.फुलझेले यांनी पीक लागवडीचे तंत्रज्ञान, खत व्यवस्थापन, पीक संरक्षण वाणाची निवड आदीवर मार्गदर्शन केले. तसेच कृषी क्षेत्र अधिकारी सौ.पी.एस. काशीद यांनी शुध्द बियाणे तयार करण्याची पदध्त , लागवड महाबीजचे उच्च गुणवत्तेचे जैविक खते व जैविक बुरशीनाशकांबाबत माहिती दिली या वेळी शेतक-यांनी कांदा बिजोत्पादन व जैविक खते आणि जैविक बुरशीनाशक इ. बाबत उत्तम प्रतिसाद दिला. यावेळी बोरखेड रयत फार्मर प्रोड्युसर कपनीचे डायरेक्टर विठ्ठल घरत, रामचंद्र शिंदे, खडु सगळे, आदम पठाण सह शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

### मिलिंद विद्यालयात 'शालेय क्रिडा व सांस्कृतिक सप्ताहाची' प्रा.डॉ.यल्लावाड यांच्या मार्गदर्शनाने सांगता



**परळी वै । प्रतिनिधी**

नाथ शिक्षण संस्था संचलित, मिलिंद माध्यमिक विद्यालय व मिलिंद ज्युनियर कॉलेज,परळी वै.येथे संस्थेचे अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री तसेच विद्यमान आमदार मा.श्री.धनंजयजी मुंडे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त ; संस्थेच्या सचिव सौ.राजश्रीताई धनंजयजी मुंडे व सहसचिव मा.श्री.प्रदीपजी खाडे साहेब, यांच्या मार्गदर्शनाखाली नाथ शिक्षण संस्थेच्या वतीने आयोजित 'शालेय क्रिडा व सांस्कृतिक सप्ताहाचा' प्रा.डॉक्टर राजकुमार यल्लावाड सर यांच्या मार्गदर्शनाने व बक्षीस वितरण कार्यक्रमाने समारोप करण्यात आला. मा.आ.श्री.धनंजयजी मुंडे साहेब यांच्या वाढदिवसाच्या निमित्तानं आयोजित सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमास अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक श्री.कदरकर बी.जी. , प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रा.डॉ.राजकुमार यल्लावाड, मिलिंद ज्युनियर कॉलेजचे प्राचार्य श्री.शिंदे व्ही.एन.,उप-प्राचार्य श्री.इरफान शेख, वृक्षमित्र श्री.सुनील आदोडे इत्यादी मान्यवर मंचावर उपस्थितीत होते. कार्यक्रमाची सुरुवात क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आली. कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शन म्हणून उपस्थितीत मराठवाडा साहित्य परिषदेचे पदाधिकारी प्राध्यापक डॉक्टर राजकुमार यल्लावाड सर यांनी उपस्थितीत विद्यार्थ्यांस मोलाचे मार्गदर्शन केले. मा.आ.श्री.धनंजयजी मुंडे साहेब यांच्या वाढदिवसा निमित्त आयोजित सप्ताहाच्या सांगता कार्यक्रमात दिनांक १५ जुलै ते २२ जुलै पर्यंत घेण्यात आलेल्या विविध सहशालेय उपक्रमात सहभागी झालेल्या व यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते शैक्षणिक साहित्य वाटप करून सत्कार करण्यात आला. शाळेचे मुख्याध्यापक श्री.कदरकर बी.जी.यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत अध्यक्षीय समारोप केले. कार्यक्रमास व मिलिंद माध्यमिक विद्यालयातील व मिलिंद ज्युनियर कॉलेजचे सर्व विद्यार्थी, शिक्षक, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन शाळेतील सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री.नितीन व्हावळे सर यांनी केले तर आभार दराडे आर.डी. यांनी मानले.